



रयत शिक्षण संस्थेचे,

## महात्मा फुले कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,

## पनवेल. जि. रायगड – ४१०२०६

Accredited at 'A' Grade by NAAC (Third Cycle CGPA - 3.18)
'Best College Award' By University of Mumbai

ISBN No.: 978-93-5311-692-7

मराठी विभाग आयोजित

एकदिवसीय आंतरराष्ट्रीय चर्चासत्र

# जागतिकीकरण आणि मराठी साहित्य प्रवाह

बुधवार दि. २८ मार्च २०१८

## शोधनिबंध पुस्तिका



Scanned by CamScanner

रयत शिक्षण संस्थेचे,

**महात्मा फुले कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,**
**पनवेल. जि. रायगड – ४१०२०६**

Scanned by CamScanner





रयत शिक्षण संस्थेचे,

# महात्मा फुले कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,

## पनवेल. जि. रायगड – ४१०२०६

**Accredited at 'A' Grad by NAAC (Third Cycle CGPA – 3.18)**

**'Best College Award' By University of Mumbai**

## मराठी विभाग आयोजित

## एकदिवसीय आंतरराष्ट्रीय चर्चासत्र

# "जागतिकीकरण आणि मराठी साहित्य प्रवाह"

## बुधवार दि. २८ मार्च २०१८

# शोधनिबंध पुस्तिका



**संपादक**

प्रा. चिंतामण धिंदळे

मराठी विभाग प्रमुख

**प्रकाशक**

प्राचार्य डॉ. गणेश ठाकूर

महात्मा फुले कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, पनवेल

जि. रायगड – ४१०२०६

**ISBN NO :978-93-5311-692-7**

Scanned by CamScanner

ISBN NO :**978-93-5311-692-7**

प्रकाशक :
प्राचार्य डॉ. गणेश ठाकूर
महात्मा फुले कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,
पनवेल, जि. रायगड – ४१०२०६

संपादक :
प्रा. चिंतामण धिंदळे
मराठी विभाग प्रमुख

सर्व हक्क :
रयत शिक्षण संस्थेचे,
महात्मा फुले कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,
पनवेल, जि. रायगड – ४१०२०६ (महाराष्ट्र.)
फोन नं. :- (०२२) २७४५२५६१, २२९२३५९२
Website :- www.mpasccollege.com
Email :- prinmpascpanvel@yahoo.co.in

प्रथम प्रकाशन :
२८ मार्च २०१८
मुखपृष्ठ : प्रा. एस.एल.गोवे
कलानिर्देशन : प्रा. डॉ. अतुल चौरे

एकदिवसीय आंतरराष्ट्रीय चर्चासत्रानिमित्त संपादित केलेल्या शोधनिबंध पुस्तिकेतील शोधनिबंध लेखकांच्या विचारांशी संपादक, प्रकाशक, महाविद्यालय व संस्था सहमत असेलच असे नाही. शोधनिबंध लेखकांची त्यांच्या विषयानुसार ती त्यांची वैयक्तिक मते व निष्कर्ष आहेत.

- संपादक

Scanned by CamScanner

| अ.क्र. | शोधनिबंधाचे शीर्षक | लेखकाचे नाव | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| ९४ | जागतिकीकरण आणि मराठी कादंबरी | डॉ. रावसाहेब ननावरे | २७५ – २७७ |
| ९५ | जागतिकीकरणाचा भारताच्या ग्रामीण विकासावर परिणाम - एक दृष्टीक्षेप | डॉ.प्रफुल्ल वशेणीकर<br>डॉ.यशवंत उलवेकर | २७८ – २७९ |
| ९६ | भूमंडलीकरण के दौर में आदिवासी भाषा—साहित्य की प्रासंगिकता (आदिवासी कविता के विशेष संन्दर्भ में) | डॉ.सुजाता पाटील | २८० – २८२ |
| ९७ | भूमंडलीकरण और आदिवासी उपन्यास साहित्य | डॉ.प्रशांत नलवडे | २८३ - २८५ |
| ९८ | जागतिकीकरणानंतरच्या मराठीतील महानगरी कवितेचे आधुनिकवादी / उत्तर आधुनिकवादी दृष्टिकोनातून विश्लेषण | प्रा. आशा कुंभार | २८६ – २८९ |
| ९९ | जागतिकीकरण आणि स्त्रीवादी साहित्य | प्रा.प्रज्ञा कांबळे-शिरगांवकर | २९० – २९३ |
| १०० | जागतिकीकरण आणि मराठी साहित्य | डॉ. एन. आर. मढवी | २९४ – २९५ |
| १०१ | Post colonialism in Waiting for Barbarians by J.M.Cotzee | Pr. Shubhangi Lavate | २९६ – २९७ |
| १०२ | जागतिक प्रश्नांच्या आगीचे चक्र समर्थपणे भेदणारी दलित कविता | प्रा.गुंडोपंत पाटील. | २९८ – ३०१ |
| १०३ | जागतिकीकरण आणि ग्रामीण साहित्य प्रवाह (आसाराम लोमटे यांच्या कथांवर आधारित) | प्रा.रंजिता वीरकर | ३०२ – ३०४ |
| १०४ | जागतिकीकरण आणि नव्वदोत्तरी ग्रामीण कविता | प्रा. सायली पिलणकर | ३०५ – ३०७ |
| १०५ | जागतिकीकरण आणि आंबेडकरी कविता | प्रा. दिलीप बर्वे | ३०८ – ३१३ |
| १०६ | इतिहासाच्या साधनाध्ये मराठी साधनाचे स्वरूप | डॉ . सुनिल परदेशी . | ३१४ – ३१५ |
| १०७ | जागतिकीकरणाचा भोग आणि उपभोगाच्या शोकात्मतेचे परिमाण : 'आनंदभोग मॉल' | डॉ. निधी पटवर्धन | ३१६ – ३१८ |
| १०८ | जागतिकीकरण अणि स्त्रीवादी साहित्य प्रवाह | प्रा. क्रांती हरेश पैठणकर | ३१९ – ३२२ |
| १०९ | जागतिकीकरण आणि आदिवासी कविता | प्रा. चिंतामण धिंदळे | ३२३ – ३२५ |
| ११० | १९९० नंतरची ग्रामीण कादंबरी | डॉ. अतुल चौरे | ३२६ – ३२९ |
| १११ | जागतिकीकरण आणि ग्रामीण साहित्य प्रवाह | डॉ. पृथ्वीराज तौर | ३३० – ३३३ |
| ११२ | जागतिकीकरण आणि मराठी बालसाहित्याचे वर्तमान | प्रा. विद्या सुर्वे - बोरसे | ३३४ – ३३४ |
| ११३ | जागतिकीकरण आणि साठोत्तरी मराठी ग्रामीण कादंबरी (निवडक मराठी ग्रामीण कादंबऱ्याच्या अनुषंगाने) | प्रा.विलास सुर्वे | ३३५– ३३७ |
| ११४ | जागतिकीकरण आणि आंबेडकरवादी साहित्यप्रवाह | डॉ. राजाभाऊ भैलुमे | ३३८ – ३४२ |
| ११५ | जागतिकीकरण आणि मराठी महानगरीय कविता | प्रा .बी .एम .ननावरे | ३४३ – ३४५ |
| ११६ | जागतिकीकरणात जुन्नर परिसरातील मराठी माणसाची भरारी | डॉ. सौ. वंदना नढे | ३४६ – ३४७ |
| ११७ | जागतिकीकरण आणि स्त्रीवादी साहित्य | प्रा.गोविंद पोटजाळे | ३४८ – ३४९ |
| ११८ | Alienation, displacement and cultural conflict in Bharati Mukherjee's Short Stories | Pr. P.Y.Kamble | ३५० – ३५३ |
| ११९ | जागतिकीकरण आणि महानगरीय साहित्यप्रवाह | डॉ. एकनाथ पगार | ३५४ – ३५६ |
| १२० | जागतिकीकरण मराठी साहित्य आणि मानसशास्त्राची भूमिका | प्रा. पुरुषोत्तम परीट | ३५७ – ३५७ |


Scanned by CamScanner

आशियातील पहिली वायनारी 'चातो इंडेज' ही चौदा नंबर, नारायणगाव (ता.जुन्नर,जि.पुणे) येथे श्री.शामराव चौघुले यांनी सुरू केली. येथे द्राक्षापासून तयार केलेली वाईन देशविदेशात निर्यात होते. मंचर येथील मोरडे फूडस प्रा. लि. (१९८३) चे मालक चंद्रकांत एकनाथ मोरडे हे बीएस्सी टेक्नो (फूड्स) म्हणजे फूड्स सायन्स अँड टेक्नॉलोजी यातील मुंबई विद्यापीठाचे पदवीधर असून मोरडे फूडस प्रा. लि.याचे मॅनेजिंग डायरेक्टर आहेत. त्यांनी कोक पासून कोक पेस्ट,कोक पावडर,कोको मास,कोको बटर, चॉकलेट चीप्स, चॉकलेट कंम्पाउंड या वस्तू बनविल्या त्यांच्या वस्तूंना युरोप, अमेरिका व साऊड अशिया अशा देशातून चांगली मागणी आहे. बोरी (ता.जुन्नर,जि. पुणे) येथील अमृत जाधव याने वर्ल्ड अॅडल्ट मेमरी चॅम्पियनशीप २०१६ मध्ये ९४ वा नंबर मिळवला आहे. मूळचे आळेफाटा (ता.जुन्नर, जि.पुणे) येथील परंतु मुंबई येथील दत्तात्रय पाडेकर यांचे सुपुत्र देवदत्त पाडेकर यांनी चित्रकलेत प्रावीण्य मिळवून चित्रकलेची प्रदर्शन राज्य,राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर भरविली. 'द योकोहामा – इंटरनॅशनल चिल्ड्रन्स हॅडमेड पिक्चर बुक कॉटेस्ट – जपान' असे आंतरराष्ट्रीय स्तरावरचा पुरस्कारही त्यांनी मिळवला आहे. लंडनमधील 'मॉल गॅलरी' मधील प्रदर्शनातील त्यांच्या चित्राला 'पेस्टल सोसायटी' चा अॅवार्ड मिळाले. उब्रंज येथील श्री. अशोक हांडे हे फळाचे व्यापारी असून मुंबईत वास्तव्यास आहेत. त्यांनी 'चौरंग' ह्या संगीत संस्थेद्वारे लोककलेला व नाटयकलेला प्रोत्साहन देण्याचे कार्य केले. त्यांनी 'मंगल गाणी दंगल गाणी', 'आवाज की दुनिया', 'मराठी बाणा','गाणे सुहाणे','मन चाहे गीत', 'अमृत लता', 'मधुबाला', 'माणिक मोती', 'आजादी ५०' असे विविध कार्यक्रमाची निर्मिती केली व हे कार्यक्रम लंडन, अमेरिका, बेलझीयम,दुबई, कॅनडा, शिकागो, युरोप अशा अनेक देशात सादर केले. अमेरिकेने त्यांना अॅवार्ड देऊन गौरविले आहे.

राजुरी (ता.जुन्नर,जि.पुणे) येथील मंगेश हाडवळे यांनी ललित कला केंद्र पुणे विद्यापीठ येथील थिएटर या विषयात पदवी संपादन केली. फिल्म निर्मिती व लेखनाची आवड असलेले हाडवळे मुंबईत गेले व त्यांनी २००८ मध्ये पहिली मराठी फिल्म केली 'टिंग्या' याला दिग्दर्शनासाठी एफआयपीआरईएससीआय इंटरनॅशनल क्रिट्रीक अॅवार्ड व एमएएमआय इंटरनॅशनल फिल्म फेस्टिवल, मुंबई, 'देख इंडियन सर्कस' या हिंदी फिल्मला पीएसबी/ केएनएन अॅडीयन्स अॅवार्ड –१६वे भूसन इंटरनॅशनल फिल्म फेस्टिवल,बेस्ट चिल्ड्रन्स फिल्म गोल्डन रिल अॅवार्ड आणि ११वे टीब्रन इंटरनॅशनल फिल्म फेस्टिवल –कॅलिफोरनीया, 'टपाल' या 'इंडियन पनोरमा' हे इंटरनॅशनल फिल्म फेस्टिवल ऑफ इंडिया हा अॅवार्ड मिळाले आहेत. असा जुन्नर तालुक्यातील मराठी माणूस जागतिकीकरणात परिस्थितीवर मात करून स्वत:ला उंच भरारी घेताना दिसतो.

Scanned by CamScanner